यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

**प्रेषक-** संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

**विषय-** इतिवृत्त मान्यतेबाबत. आणि विद्वत परिषदेमध्ये ठेवणेबाबत.

धारीका-शि.शा. 2024/

**प्रति-** मा कुलगुरु,

दिनांक 31/12/2024

महोदय,

वरील विषयांन्वये दि. 04.09.2024 रोजी शिक्षणशास्त्र विद्याशाखे अंतर्गत 62 वी विद्याशाखा परिषद घेण्यात आली.

1. विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त मान्यतेसाठी पाठवित आहे. कृपया त्यास मान्यता द्यावी, ही विनंती.
2. विद्याशाखा परिषद बैठक क्र. 62 च्या इतिवृत्तास मान्यता मिळाल्यानंतर मान्यता दिलेल्या इतिवृत्तास पुढील होणा-या 65 व्या दिनांक १३.०१.२०२५ रोजी होण्याऱ्या विद्वत परिषदेमध्ये ठेवण्यास मान्यता मिळावी, ही विनंती..

संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

सोबत — इतिवृत्त बैठक क्रमांक 62

मा.कुलगुरू

31/12/24

School Council Education

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (Education School Council)**

बैठक क्र. 62 वी दिनांक. 04.09.2024

---

## इतिवृत्त

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 62 दि. 04.09.2023 रोजी सकाळी 11.00 ते 01.30 या वेळेत online करण्यात आली आहे. सदर बैठकीस बहिस्थ सदस्य व अंतगर्त सदस्यांची नावे,खालील प्रमाणे.

1. . प्रा. संजिवनी महाले प्रोफेसर, अध्यक्ष व संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
2. डॉ.भरतभाई जोशी, कुलगुरु युनिव्हर्सिटी ऑफ गुजराथ विद्यापीठ, गुजरात
3. डॉ. चंद्रकांत बाविस्कर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, सदस्य
4. डॉ. निशा वळवी, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,सदस्य
5. डॉ. चेतना सोनकांबळे, श्री.शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,सदस्य
6. डॉ. लतिका गायकवाड. सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विद्याशाखा सदस्य
7. डॉ. प्रविण घोडेस्वार, प्राध्यापक विद्यार्थी सेवा विभाग , सदस्य
8. डॉ. शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक विद्यार्थी सेवा विभाग ,सदस्य
9. प्रा. विजयकुमार पाईकराव सहयोगी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा,सदस्य सचिव
10. डॉ. दयाराम पवार सहायक प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा ,सदस्य
11. डॉ. सुभाष सोनुने सहायक प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा ,सदस्य
12. डॉ. साधना लामतुरे शैक्षणिक संयोजक, CDS निमंत्रित सदस्य
13. श्री. ज्ञानेश्वर जाधव शैक्षणिक संयोजक, CDS निमंत्रित सदस्य
14. श्री. शिवानंद कहाळेकर शैक्षणिक संयोजक, CDS निमंत्रित सदस्य
15. डॉ. राजकुमार चन्नावरे शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा निमंत्रित सदस्य
16. श्रीम. वर्षा बहिरम शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा निमंत्रित सदस्य
17. श्रीम. स्नेहल मांजरेकर शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा निमंत्रित सदस्य

School Council Education

**काही कारणास्तव खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.**

१)प्रा. संजय चाकणे ,तुलाराम महाविद्यालय, पुणे

२)डॉ. अमृत भारवाड, गुजरात विद्यापीठं, अहमदाबाद गुजरात,सदस्य

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची 2024 या वर्षातील द्वितीय बैठक क्र. 62 दि. 04.09.2024 रोजी स.11.00 या वेळेत onlineतसेच offline पध्दतीने आयोजित केली होती. या बैठकीचे निर्णय सर्वानुमते पुढील प्रमाणे घेण्यात आले.**

| क्रमांक | विषय |
|---|---|
| 62. | **उपस्थित सदस्यांचे स्वागत विजयकुमार पाईकराव यांनी केले.** |
| 62.01 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 01**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६१ च्या इतिवृत्त मान्यता.<br>**निर्णय:** ६१च्या परिषदेचे इतिवृत्तवाचन करून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>(सहपत्र 1) |
| 62.02 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 02**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६१ च्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे.<br>**निर्णय:** ६१ च्या परिषदेच्या कार्यवाही अहवालाची माहिती अध्यक्ष यांनी करून दिली. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. (सहपत्र 2) |
| 62.03 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 03**<br>**विषय : पी.एचडी. शिक्षणक्रम प्रवेश पात्रता**<br>**टिपणी** : विद्यापीठात विद्यावाचस्पती (PhD) हा शिक्षण क्रम (Regular /Part Time Mode) मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून सुरु होणाऱ्या प्रवेश प्रकियेला (UGC) च्या सुधारित नियमानुसार (दिनांक २७ मे २०२४ चे पत्र) मान्यता मिळण्यास सादर. प्रवेश पात्रतेचे नियम सोबत दिलेले आहे.<br>**निर्णय:**पी.एच. डी. शिक्षणक्रम प्रवेश पात्रता निकषास मान्यता देण्यात आली<br>(सहपत्र 3) |
| 62.04 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 04**<br>**विषय : एम.ए. शिक्षणशास्त्र सन २०२२-२०२४ तुकडी संशोधन अहवाल परिशीलन दुरुस्त संशोधन अहवाल कार्यवाही.**<br>**टिपणी** : एम.ए. (शिक्षणशास्त्र) विद्याशाखा परिषद क्र. 61 विषय क्र. एफ 180/2024/05 एम.ए.शिक्षणशास्त्र दि. 03.07.2024 नुसार मान्यता देण्यात आलेली होती. त्यास विद्वत परीषद क्र. 64. विषय क्र.64.2.1, 64.3.2 दि. 04.07.2024 नुसार. एम.ए. शिक्षणशास्त्र सन २०२२-२०२४ या तुकडीसाठी संशोधन कार्याचे परिशीलन कार्यवाही मान्यता देण्यात आलेली होती. शिक्षणशास्त्र विद्याशाखेत एकूण ९३ केंद्रांचे संशोधन अहवाल जमा झाले. त्यांचे परिशीलन शिक्षणशास्त्र विद्याशाखा प्रतिनिधी आणि अभ्यासकेंद्र प्रतिनिधी मार्फत करण्यात आले, त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे. |

School Council Education

| विद्यार्थी प्रवेश | सं शोधन अहवाल जमा | संशोधन अहवाल स्वीकार | संशोधन अहवाल दुरुस्ती | संशोधन अहवाल कॉपी केस |
|---|---|---|---|---|
| ४७८४ | ४६०७ | ३६२९ | ४२४ (+१ rejected) | ५५३ |

संशोधन अहवाल दुरुस्ती कार्यवाही व सूचना सहपत्र ४ मध्ये दिलेले आहे.

**निर्णय:** एम.ए. शिक्षणशास्त्र सन २०२२-२०२४ तुकडी संशोधन अहवाल परिशीलन दुरुस्त संशोधन अहवाल चर्चे अंती निर्णयास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. **(सहपत्र4)**

62.05 **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 05**

**विषय : एम.ए. शिक्षणशास्त्र सन २०२२-२०२४ तुकडी संशोधन अहवाल परिशीलन साम्य संशोधन अहवाल कार्यवाही**

**टिपणी :** एम.ए.शिक्षणशास्त्र (M82) तुकडी २०२२-२०२४ चे संशोधन अहवाल अभ्यासकेंद्राकडून विद्यापीठात सादर झाले. त्यांचे परिशीलन शिक्षणशास्त्र विद्याशाखा प्रतिनिधी आणि अभ्यासकेंद्र प्रतिनिधी ह्यांचेमार्फत करण्यात आले. तीन प्रकारचे संशोधन अहवाल शोधगंगा वरील समान (copy) आहे. असे निदर्शनास आलेले आहेत. त्याबाबतची सविस्तर कार्यवाही सहपत्र ५ मध्ये दिलेले आहे.

**निर्णय:** एम.ए. शिक्षणशास्त्र M82 तुकडी सन 2022-2024 अहवाल साम्य संशोधन कार्यवाहीसं मान्यता देण्यात आली . **(सहपत्र 5)**

62.06 **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/06**

**विषय : शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अभ्यासकेंद्र मान्यतेबाबत निकष कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...**

**टिपण्णी :** "शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमासाठी नवीन अभ्यासकेंद्र देण्याबाबतचे व अभ्यासकेंद्र पुनर्रमान्यता बाबतचे निकष विद्याशाखेत तयार करण्यात आलेले होते. सदर तयार करण्यात आलेल्या निकषांना मा. कुलगुरूंनी दिनांक: २२/०७/२०२४ रोजीच्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

**विषय मान्यतेसाठी सादर** : शिक्षणशास्त्र विद्याशाखा नवीन अभ्यासकेंद्र देण्याबाबत व पुनर्रमान्यता बाबतचे निकष शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेसमोर कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...

**निर्णय:** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांचे अभ्यासकेंद्र मान्यतेबाबत निकषांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

**(सहपत्र 6)**

62.07 **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 07**

**विषय : एम.ए. पालकत्व शिक्षण शिक्षणक्रम विकसन सुरु करणेसाठी तज्ञ सल्लागार समिती कार्योत्तर मान्यता बाबत..**

**टिपणी** - NEP 2020 च्या मार्गादर्शक तत्वानुसार आणि नियोजन मंडळ सहविचारसभा मान्यतेनुसार **"एम.ए. पालकत्व शिक्षण शिक्षणक्रम,,** नवीन विकसन करण्यासाठी व तज्ञ सल्लागार समिती गठीत करण्यासाठी मा. कुलगुरूनी दि. ०५/०७/२०२४ च्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार मान्यता दिली आहे. त्यानुसार कार्योत्तर मान्यतेसाठी सादर

School Council Education

**विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर** : एम.ए. पालकत्व शिक्षण शिक्षणक्रम विकसन करण्यासाठी तज्ञ सल्लागार समिती कार्योत्तर मान्यते साठी सविनय सदर  बाबत..

**निर्णय:** एम.ए. पालकत्व शिक्षणक्रम विकसनाच्या  व तज्ञ सल्लागार समितीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

**(सहपत्र 7)**

62.08 **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 08**

**विषय : बी. एड. अभ्यासकेंद्रावर अध्ययनार्थी प्रवेश संख्येबाबत..**

**टिपणी :** NCTE कडून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ शिक्षणशास्त्र विद्याशाखेत १५०० इतकी प्रवेश क्षमता NCTE च्या १७/०१/२०१४ च्या पत्रानुसार मान्य करण्यात आलेली आहे. सदर प्रवेश संख्येनुसार महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यातील ३५ अभ्यासकेंद्रावर ४२/४३ इतक्या संख्येने प्रवेश दिले जात होते. २०१४ मध्ये पालघर जिल्ह्याची निर्मिती नव्याने झाली. नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्यातील शिक्षकांनी स्वतंत्र अभ्यासकेंद्राची मागणी २०१४ पासून केले होती. मात्र २०२४ मध्ये पालघर जिल्ह्याला स्वतंत्र अभ्यासकेंद्र विद्यापीठाकडून मान्य करण्यात आले, त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यासाठी बी.एड. प्रवेश क्षमता ४१/४२ इतके देण्यास मान्यता द्यावी, ४१/४२ प्रवेश क्षमता निश्चितीसाठी ज्या जिल्ह्यात जास्त प्रवेश अर्ज आहेत, त्या जिल्ह्याला ४२ जागा देण्यात येतील. सोबत जिल्हा निहाय प्रवेश संख्या सहपत्र जोडलेले आहे. बी. एड. शिक्षणक्रमाच्या अभ्यास्केंद्रावर अध्ययनार्थी प्रवेश क्षमता ४१/४२ इतके देण्यात यावे सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**निर्णय:** बी. एड. अभ्यासकेंद्रावर अध्ययनार्थी प्रवेश ४१/४२ करण्यास मान्यता देण्यात आली .

**(सहपत्र 8)**

62.09 **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/09**

**बी.एड. (P80) माहितीपुस्तिका २०२४-२६ मान्यतेबाबत.**

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्गत कार्यान्वित असलेल्या बी.एड. शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका २०२४-२६ शिक्षणशास्त्र विद्याशाखा व विद्यार्थी सेवा विभाग यांच्या संयुक्तरित्या विकसित करण्यात आली आहे. सोबत सहपत्र बी.एड. माहितीपुस्तिका २०२४-२६.

**विषय मान्यतेसाठी सादर:** बी.एड. शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका २०२४-२६ शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेसमोर चर्चा व मान्यतेस्तव सादर....

**निर्णय:** बी.एड. (P80) माहितीपुस्तिका २०२४-२६ -विकसनास मान्यता देण्यात आली.

**(सहपत्र 9)**

62.10 **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/10**

**पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र बी.एड. अभ्यासकेंद्रास मान्यता देण्याबाबत...**

**टिप्पणी :** महाराष्ट्रात २०१४ पूर्वी ३५ जिल्हे होते. ठाणे जिल्ह्यातून २०१४ ला पालघर ह्या स्वतंत्र जिल्ह्याची निर्मिती झाल्यामुळे पालघर जिल्ह्यातील सर्व बी.एड. प्रवेच्छुकांनी स्वतंत्र अभ्यासकेंद्राची मागणी २०१४ पासून केली आहे. सदर मागणीनुसार, NCTE कडे विद्यापीठाने पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र अभ्यासकेंद्र देणेबाबत पत्रव्यवहार केला आहे. मात्र त्यास अद्याप उत्तर मिळाले नसल्याने, मा. कुलगुरूंच्या परवानगीने पालघर जिल्ह्यासाठी बी.एड. अभ्यासकेंद्र स्थापन करण्यासाठी मुंबई विभागातील संचालकांकडून बी.एड. अभ्यासकेंद्राची नावे मागविण्यात आली होती. त्यानुसार पालघर जिल्ह्यातील दोन अभ्यासकेंद्रांनी बी.एड. अभ्यासकेंद्र स्थापन करण्यासाठी उत्सुकता दाखविली होती. त्यानुसार

School Council Education

१) दीप एज्युकेशन सोसायटीचे, ए.जी. एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय बोईसर, जि. पालघर.

२) जे.पी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, हरेवाडी नाका, मोहीम रोड पालघर.

पावसाचे प्रमाण प्रचंड असल्यामुळे दोन अभ्यासकेंद्रांची ऑनलाईन पद्धतीने पाहणी करण्यात आली. बी.एड. अभ्यासकेंद्र स्थापन करण्यासाठी 'दीप एज्युकेशन सोसायटीचे, ए.जी. एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय बोईसर, जि. पालघर.' या महाविद्यालयास बी.एड. अभ्यासकेंद्र देण्यासाठी मा. कुलगुरूंना शिफारस करण्यात आली. त्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. सोबत सहपत्र जोडले आहे.

**विषय मान्यतेसाठी सादर:** संदर विषय मान्यतेसाठी विद्याशाखा परिषदेसमोर चर्चा व मान्यतेस्तव सादर.

**निर्णय:** दीप एज्युकेशन सोसायटीचे, ए.जी. एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय बोईसर, जि. पालघर. या ठिकाणी पालघर जिल्ह्यासाठी बी.एड. अभ्यासकेंद्रास मान्यता देण्यात आली.

**(सहपत्र 10)**

62.11 **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/11**

**बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२३-२४ पासून अभ्यासकेंद्र मानधन वितरण पुस्तिका बाबत...**

**टिप्पणी :** आपल्या विद्यापीठात बी.एड. विशेष शिक्षणक्रम सन २०१५ पासून कार्यान्वित केला जातो. ह्या शिक्षणक्रमाच्या शुल्क वाढीबाबत विद्यापीठाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सन २०१८-२०२३ संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क रु. २८०००/- इतके होते. एकूण शुल्काचा विद्यापीठ हिस्सा ५०%आणि अभ्यासकेंद्र हिस्सा ५०% अशी स्वरुपाची विभागणी होती. सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क वाढ करण्यात आलेली आहे. तसेच बी. एड. विशेष शिक्षणक्रम हा RCI मान्यता प्राप्त आहे. विद्यापीठाने RCI सोबत सामंजस्य करार केलाला आहे. त्या करारानुसार RCI ला शिक्षणक्रमाच्या १०% रक्कम देणे बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यापीठ हिस्सा ५०% अभ्यासकेंद्र हिस्सा ४० % आणि RCI हिस्सा १०% शिक्षणक्रम शुल्काची विभागणी केलेली आहे. अभ्यासकेंद्र शुल्क ४०% एकूण रु. १५६४०/- (प्रती विद्यार्थी ) इतके आहे. हे शुल्क अभ्यासकेंद्राने बाबनिहाय वापर कसा करावयाचा यासाठी अभ्यासकेंद्र मानधन वितरण पुस्तिका विकसित केलेली आहे. तरी विद्यापीठाच्या शिक्षणक्रम शुल्क वितरणास मान्यता घेतलेली आहे. अभ्यासकेंद्र मानधन वितरण पुस्तिका सहपत्र ११ मध्ये सोबत जोडण्यात आली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**निर्णय:** .बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२३-२४ पासून अभ्यासकेंद्र मानधन वितरण पुस्तिकेस किरकोळ बदलासह मान्यता देण्यात आली. **(सहपत्र 11)**

62.12 **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 12**

**विषय : अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम संरचना आणि PPR फॉर्म बाबत...**

**टिपणी :** अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रमा संदर्भात शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र.५८ दिनांक ०३.१०.२०२३ विषय क्र.५८.११.०५ मान्यता देण्यात आली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीच्या वृत्तांताला दि.२९. ११. २०२३ रोजी झालेल्या विद्वत परिषदेमध्ये मान्यता मिळालेली आहे. संदर्भानुसार विद्यापीठात अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसनासाठी तज्ज्ञ सल्लागार समितीने शिक्षणक्रम संरचना विकसित केलेली आहे. अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची शिक्षणक्रम संरचना आणि PPR अर्ज तयार

School Council Education

| | |
|---|---|
| | करण्यात आलेला आहे. **(सहपत्र १२)** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय:** अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम सरचनेस व PPR फॉर्मला मान्यता देण्यात आली. **(सहपत्र 12)** |
| 62.13 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 13**<br>**विषय : समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम संरचना आणि PPR फॉर्म बाबत...**<br>**टिपणी :** नवीन शैक्षणिक धोरण (२०२०) (मुद्दा.६.) नुसार दिव्यांगाना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठीचे प्रावधान करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने अंगणवाडी शिक्षिका, विशेष शिक्षक आणि मुख्यप्रवाहातील शिक्षकांना समावेशित शिक्षणात कार्य करण्यासाठी विद्यापीठामार्फत संबधित प्रमाणपत्र शिक्षणक्रम संरचना विकसित केलेली आहे. समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची शिक्षणक्रम संरचना आणि PPR अर्ज तयार करण्यात आलेला आहे. **(सहपत्र १३)** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय:** समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम संरचना आणि PPR फॉर्मला मान्यता देण्यात आली... **(सहपत्र 13)** |
| 62.14 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 14**<br>**विषय : बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत अतिरिक्त गुण मिळणे बाबत...**<br>**टिप्पणी :** आपल्या विद्यापीठात बी. एड. विशेष शिक्षणक्रम सन २०१५ पासून कार्यान्वित केला जातो. सदर शिक्षणक्रमासाठी इच्छुक उमेदवारांना पदवीचे गुण त्याव्यतिरिक्त त्यांना अतिरिक्त गुण विविध पैलूंवर दिले जातात. जसे य.च.महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची पदवीचे, पदविकेचे, विशेष मुलांचे पालक असल्यास, RCI मान्य पदविका आणि पदवी केली असल्यास देखील त्यांना अतिरिक्त गुण दिले जायचे. RCI मान्य पदविका आणि पदवी ह्या दोन्ही पदव्या समकक्ष नसल्याने समान गुण देणे योग्य ठरणार नाही. म्हणून RCI मान्य पदविका असल्यास २ गुण आणि RCI मान्य पदवी असल्यास ३ गुण मिळावे असे वाटते. सहपत्र १४ मध्ये जोडलेले आहे. सदर विषय शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय मान्यतेसाठी सादर ...<br>**निर्णय:** बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या विशेष शिक्षणातील पदविका व पदवी शिक्षणक्रमासाठी अनुक्रमे २ व ३ अतिरिक्त गुण देण्यास मान्यता देण्यात आली. हा निर्णय २०२४ -२०२६ या तुकडीपासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली.<br>**(सहपत्र 14)** |
| 62.15 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 15**<br>**विषय : समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे पाठ्यक्रम विकसन आणि लेखकांच्या नावास मान्यते बाबत...**<br>**टिप्पणी :** समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसन करण्यासाठी तज्ञ सल्लागार समिती गठीत करण्यात आली होती. सदर तज्ञ सल्लागार समितीची बैठक **१ ऑगस्ट २०२४** रोजी आयोजीत करण्यात आलेली होती. बैठकीदरम्यान शिक्षणक्रम संरचना आणि अभ्यासक्रम विकसित करण्यात आले आहेत. सदर शिक्षणक्रमाचा पाठ्यक्रम विकसन करण्यासाठी **शिक्षणक्रमाची पाठ्यक्रम विकसन** समिती आणि संबधित पाठ्यक्रमाचे स्वयं अध्ययन साहित्य तयार करण्यासाठी लेखक समिती गठीत केलेली आहे. सदर शिक्षणक्रमाची |

School Council Education

| | |
|---|---|
| | पाठ्यक्रम विकसन समिती आणि लेखक समिती सहपत्र १५ मध्ये जोडलेले आहे. तरी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय मान्यतेसाठी सादर ...<br>**निर्णय:** समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे पाठ्यक्रम विकसन आणि लेखकांच्या नावास मान्यता देण्यात आली.<br>**(सहपत्र 15)** |
| 62.16 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 16**<br>**विषय : अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे पाठ्यक्रम विकसन आणि लेखकांच्या नावास मान्यतेबाबत...**<br>**टिप्पणी :** अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसन करण्यासाठी तज्ञ सल्लागार समिती गठीत करण्यात आली होती. सदर तज्ञ सल्लागार समितीची बैठक १ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजीत करण्यात आलेली होती. बैठकीदरम्यान शिक्षणक्रम संरचना आणि अभ्यासक्रम विकसित करण्यात आले आहेत. सदर शिक्षणक्रमाचा पाठ्यक्रम विकसन करण्यासाठी शिक्षणक्रमाची पाठ्यक्रम विकसन समिती आणि संबंधित पाठ्यक्रमाचे स्वयं अध्ययन साहित्य तयार करण्यासाठी लेखक समिती गठीत केलेली आहे. सदर शिक्षणक्रमाची पाठ्यक्रम विकसन समिती आणि लेखक समिती **सहपत्र १६** मध्ये जोडलेले आहे. तरी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय मान्यतेसाठी सादर ...<br>**निर्णय:** अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे पाठ्यक्रम विकसन आणि लेखकांच्या नावास मान्यता देण्यात आली.<br>**(सहपत्र 16)** |
| 62.17 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 17**<br>**विषय : National Associate for the Blind (Maharashtra Unit) Nasik (NAB) येथे अभ्यासकेंद्र कार्यान्वित करणेबाबत...**<br>**टिप्पणी :** सन २०१६ पासून विद्यापीठात बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम कार्यान्वित आहे. सन २०१५ च्या RCI च्या नियमावलीनुसार डी. एड. (विशेष शिक्षण) शिक्षणक्रम कार्यान्वित असलेल्या महाविद्यालयात बी. एड. (विशेष शिक्षण) (ODL) शिक्षणक्रम कार्यान्वित केले जात होते. मात्र RCI च्या सन २०२१ च्या नियमावली नुसार ज्या महाविद्यालयात बी. एड. (विशेष शिक्षण) नियमित पद्धतीने राबविला जातो त्याच अभ्यासकेंद्रावर मुक्त विद्यापिठाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित केले जाऊ शकते. या कारणाने NAB येथील VI चे अभ्यासकेंद्र स्थगित केलेले आहे. मात्र विद्यापीठात सन २०२२ पासून VI प्रवर्गाचे अभ्यासकेंद्र सुरु करण्यासाठी RCI ने मान्यता दिलेली आहे. विद्यापीठात NAB प्रमाणे सर्व भौतिक सुविधा नाही. विद्यापीठाच्या मुख्यालयातील बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे दृष्टीबाधित (VI) प्रवर्गाचे अभ्यास केंद्रावरील विद्यार्थ्यांचे प्रवेश मुख्यालयातील अभ्यासकेंद्रावर होतील आणि समंत्रण, संबधित विषयाचे प्रात्यक्षिक कार्य NAB संस्थेमार्फत पूर्ण करण्यात येईल. तरी विद्यापीठाचे बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे दृष्टीबाधित (VI) प्रवर्गाचे अभ्यासकेंद्र NAB नाशिक येथे कार्यान्वित करण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय:** : National Associate for the Blind (Maharashtra Unit) Nasik (NAB) येथे विशेष बी.एड. VI शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली. |

62.18 **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 18**

**विषय : Shadow Teacher and Shadow Co-learner प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकासानाबाबत ...**

**टिप्पणी :** छाया शिक्षक किंवा सहअध्ययनार्थ्यांची छाया ही दिव्यांग मुलांना मुख्य प्रवाहातील वर्गखोल्यांमध्ये अतिरिक्त आधार प्रणाली म्हणून काम करतात. या मुलांच्या विशिष्ट गरजा आणि नियमित वर्गामध्ये उपलब्ध संसाधनांमधील अंतर भरून काढण्यासाठी ते मुख्य शिक्षकांसोबत दिव्यांगाना अध्ययन करण्यासाठी मदत करतात. तर दिव्यांग मुलांचे भाऊ, - बहिण, मित्र मंडळी अशा समावेशित शिक्षणाच्या दृष्टीने तयार करणे आवश्यक वाटते. अशा दिव्यांग मुलांना समावेशित्त समाजाचा भाग करून घेण्यासाठी त्याचे शिक्षण मुख्यप्रवाहात, Barrier Free व्हावे त्यासाठी **Shadow Teacher and Shadow Co-learner प्रमाणपत्र शिक्षणक्रम** विकसन करण्यास इच्छुक आहोत. तरी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय मान्यतेसाठी सादर ...

**निर्णय:** Shadow Teacher and Shadow Co-learner प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसनास मान्यता देण्यात आली.

62.19 **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 19**

**विषय : स्थगित असलेल्या अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थ्यांचा प्रवेश कार्यान्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर करणेबाबत..**

**टिप्पणी :** बी. एड. विशेष शिक्षण (P21) शिक्षणक्रमाच्या नोंदणी कालावधी हा पाच वर्षासाठी आहे. सन २०२० आणि २०२१ च्या तुकडीची विद्यार्थ्यांचे नोंदणी कालावधी अनुक्रमे सन २०२५ आणि सन २०२६ पर्यंत आहे. विद्यापीठ निर्णयानुसार सन २०२३ पासून शिक्षणक्रम शुल्कात वाढ करण्यात आलेली आहे (परिशिष्ट-१). सदर विद्यार्थ्यांचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी शिक्षणक्रम सन २०२४-२५ वर्षाचे पार्ट-A, पार्ट-B शैक्षणिक आणि अभ्यासकेंद्र शुल्क (परिशिष्ट-२) प्रमाणे भरून द्वितीय आणि तृतीय वर्षाचे प्रवेश घेण्यासाठी प्रवेश लिंक उपलब्ध करून द्यावयाची आहे.

विद्यापीठाने स्थगित केलेले अभ्यासकेंद्र (परिशिष्ट-३) आहे. तर स्थगित असलेल्या अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थ्यांना मुख्यालयात कार्यान्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर प्रवेशीत करण्यास मान्यता मिळावी. सदर विद्यार्थ्यांना अद्ययावत शिक्षणक्रम सन २०२४-२५ वर्षाचे पार्ट-A, पार्ट-B शैक्षणिक आणि अभ्यासकेंद्र शुल्क परिशिष्ट २ प्रमाणे भरून शिक्षणक्रम पूर्ण करण्यास मान्यता मिळावी. **सहपत्र** 17 मध्ये जोडलेले आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...

**निर्णय:** स्थगित असलेल्या अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थ्यांचा प्रवेश सध्या कार्यान्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर स्थलांतरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे (**सहपत्र** 17)

62.20 **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 20**

**विषय : विभागीय केंद्रावर बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित करण्याबाबत...**

**टिप्पणी :** बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र विभागीय केंद्रावर कार्यान्वित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद ५७ व्या बैठकीमध्ये विषयाला मान्यता घेण्यात आली होत. मात्र भारतीय पुनर्वास परिषद नवी दिल्ली यांची प्रत्येक आठवड्याच्या बुधवारी online स्वरुपात बैठक असते. त्यामध्ये अभ्यासकेंद्र हे फक्त ज्या ठिकाणी नियमित बी.एड. विशेष शिक्षणक्रम कार्यान्वित आहे त्याच अभ्यासकेंद्रावर अभ्यासकेंद्र देता येईल असे सांगितले आहे. बी.एड.

विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र विभागीय केंद्रावर कार्यान्वित करता येणार नाही. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषयाची मान्यता रद्द करण्यासाठी सादर ...
**निर्णय:** विभागीय केंद्रावर बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यास आली नाही.

62.21 **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 21**
**विषय : उच्च शिक्षण पदविका शिक्षणक्रम तज्ज्ञ सल्लागार समिती कार्योतर मान्यता**
**टिपणी** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत उच्च शिक्षण पदविका शिक्षण क्रमास दि. ०२/०७/२०२४ रोजी झालेला नियोजन मंडलाच्या बैठकीस मान्य झाला असून त्या संदर्भातील तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्य व शिक्षणक्रमाच्या रचनेस कार्योत्तर मान्यतेसाठी व चर्चेसाठी **सादर.** तज्ञ सदस्यांची मान्यता प्राप्त यादी सोबत जोडलेली आहे.
**निर्णय:** उच्च शिक्षण पदविका शिक्षणक्रम विकसनाच्या तज्ञ सल्लागार समिती सदस्यांच्या नावांना मान्यता देण्यात आली.
**(सहपत्र 18)**

62.22 **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 22**
**विषय : २१ व्या शतकातील कौशल्य विकास**
**टिपणी :** २१ व्या शतकातील अध्ययनार्थीच्या शैक्षणिक गरजा आणि अपेक्षाही काळानुसार बदल आहेत हे लक्षात घेऊन आपल्या विद्यापीठात इतर विद्यापीठांच्या धर्तीवर राबविण्यात आलेल्या **21st century skill development** हा शिक्षणक्रम शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत राबविण्यास मान्यतेसाठी व चर्चेसाठी सादर. शिक्षणक्रमाचा आराखडा जोबत जोडलेला आहे.
**निर्णय :** २१ व्या शतकातील कौशल्य विकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसनास मान्यता देण्यात आली

62.23 **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 23**
**विषय : गणितीय आणि तार्किक कौशल्य प्रमाणपत्र**
**टिपणी :** २१ व्या शतकातील वाढत्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांवर नोकरी मिळवण्यासाठी येणारा ताण कमी करण्यासाठी आपल्या विद्यापीठात स्पर्धा परीक्षेत असणारे गणित व तार्किक क्षमता या विषयावर आधारित गणितीय आणि तार्किक प्रमाणपत्र हा शिक्षणक्रम शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे राबविण्यास मान्यता व चर्चे साठी सादर.
**निर्णय** :गणितीय आणि तार्किक कौशल्य प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसनास मान्यता देण्यात आली.
**(सहपत्र 19 )**

62.24 **विषय क्र. बी.-1 / एफ-181/ 2024/ 24**
**विषय : नेटसेट च्या अभ्यासक्रमानुसार एम ए शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमात अतिरिक्त घटक घेणेबाबत**
**टिपणी :** विद्यापीठाच्या शिक्षणक्रमात अद्ययावतता असावी यासाठी एम ए शिक्षणशास्त्र M83 या शिक्षणक्रमात नेट सेट च्या अभ्यासानुसार घटकात बदल करणे आवश्यक आहे त्यास मान्यतेसाठी सादर..

School Council Education

| | |
|---|---|
| | **निर्णय: :** नेटसेट च्या अभ्यासक्रमानुसार एम ए शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमात अतिरिक्त घटक घेण्यास मान्यता देण्यात आली. |
| 62.25 | **विषय क्र. बी.-1 / एफ-181 / 2024/ 23**<br>**ऐनवेळचे विषय –** विद्याशाखेचे सदस्य प्रा.डॉ.प्रवीण घोडेस्वार आणि प्रा.डॉ. संजीवनी महाले यांचे अभिनंदन ! बाबत<br>**टिप्पणी :** विद्याशाखेचे सदस्य प्रा.डॉ.प्रवीण घोडेस्वार यांची दत्तोपंत ठेंगडी समाज विकास संस्था सदस्य पदी नियुक्ती झाल्या बद्दल आणि प्रा.डॉ. संजीवनी महाले यांची आपल्या विद्यापीठात व्यवस्थापन मंडळ सदस्य म्हणून नियुक्ती झाल्या बद्दल अभिनंदन !<br>**निर्णय:** सर्वानुमते अभिनंदन ठराव संमत करण्यात आला व कार्यानंदासाठी शुभेच्छा दिल्या. |

शेवटी विजयकुमार पाईकराव यांनी सर्वांचे आभार मानले आणि सहविचार बैठक संपल्याचे अध्यक्षांच्या परवानगीने जाहीर केले

**.मा. कुलगुरू, कृपया मान्यतेसाठी सविनय सादर.**

प्रा. विजयकुमार पाईकराव
सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

प्रोफेसर प्रा. संजीवनी महाले
अध्यक्ष शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

मा. कुलगुरु

School Council Education